
ISSN 2394-5303



Peer Reviewed International Multilingual Research Journal

# Printing Area®

Issue-80, Vol-01, Sept. 2021

Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

September 2021, Issue-80, Vol-01

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Printing Area

www.विद्यावार्ता®.कॉम

You Tube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***









**Govt. of India,**
**Trade Marks Registry**
**Regd. No. 3418002**

http://www.printingarea.blogspot.com

13) DR. B.R. AMBEDKAR: THE POINEER OF SOCIAL DEMOCRACY
Dr. S.S. RAMAJAYAM, Tindivanam, Tamil Nadu State ||54

14) CORPORATE CRIMINAL LIABILITY: AN ANYLYTICAL STUDY OF SENTENCING ...
Ms. Deepika Srivastava & Dr. Anjali Mittal, Meerut (U.P.) ||58

15) Analytical Study of the Similarities and Dissimilarities in the thoughts of ...
Balwant Singh, Gwalior (M.P.) ||67

16) Is ESG Investing the New Trend ?
Asst. Prof. Dr. Vijaykumar R. Soni, Latur ||69

17) पैसा :- एक अभ्यास
प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल, जि.भंडारा (म.रा.) ||72

18) भारतीय जातीय अत्याचार निवारण कायदयातील सामाजिक समतेचा दृष्टीकोन
सर्जेराव नारायण बोराडे, मुंबई ||75

19) ग्रामीण विकासात इंदिरा आवास योजनेचे योगदान
डॉ. दिपाली श्रीराम घोगरे, जि. अकोला ||84

20) मानवाधिकार आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण
प्रा.डॉ. बी.आर. कुंडगीर, औंढा नागनाथ ||89

21) भारतातील दारिद्रय: कारणे व उपाययोजना
प्रा. विजयसिंग भोमसिंग पवार & डॉ. प्रदीप घोरपडे, गडचिरोली ||92

22) सावरकर आणि अंधश्रद्धा
डॉ. जयश्री संजय सातोकर, भंडारा ||94

23) चंद्रपूर जिल्ह्यातील एम.एड.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व ...
डॉ. एस.एम.सातपुते, चंद्रपूर (म.रा.) ||98

24) छत्रपती शिवरायांचे सोशल इंजिनिअरिंग
DR. Maya Wankhade, Dist. Amravati ||101

25) नारी-जीवन की विवशता का क्रन्दन: निर्मला
डॉ.योगेशभाई प्रतापसिंह झाला, झालोद (गुजरात) ||105



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

19

# ग्रामीण विकासात इंदिरा आवास योजनेचे योगदान

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य
महाविद्यालय, पातूर, जि. अकोला

---

**प्रस्तावना :** देशाच्या पंचवार्षिक योजना आणि विकास प्रक्रियेमध्ये ग्रामीण क्षेत्र आणि ग्रामीण जनतेच्या विकासाला नेहमीच प्राधान्य राहिले आहे. माणसाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत गरजा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक उपाययोजना स्वातंत्र्योत्तर काळानंतर करण्यात आल्या आहेत. मानवाच्या मूलभूत गरजांपैकीच एक गरज म्हणजे निवारा होय. माणसाला जीवन जगतांना अन्न, वस्त्र यासोबतच निवाऱ्याचीही गरज असते. पण 'भारतात २००१ च्या जनगणनेनुसार ३.११ करोड निवाऱ्यांची कमी आहे. जवळपास ४९.१ लाख कुटुंबांकडे स्वतःचे घर नाही आहे. १.२५ कोटी कुटुंब पडक्या व कच्च्या बांधलेल्या घरात राहतात. ६३ लाख कुटुंब अतिशय जुन्या घरात राहतात तर ७४ लाख लोक झोपडपट्ट्यांमध्ये जीवन जगत आहेत. ग्रामीण भागाचा विचार केला तर १.१५ करोड कुटुंब कच्च्या व पडक्या घरात राहतात, ३४ लाख अतिशय जिर्ण झालेल्या घरात राहतात, तर ५० लाख तंग वस्त्यांमध्ये राहतात.'[१]

**पार्श्वभूमी :** भारत सरकारने देशातील सर्व नागरीकांना निवाऱ्यानी सोय करण्याचा संकल्प केलेला आहे. ग्रामीण गरीब जनेतकरीता स्वातंत्र्योत्तर काळापासूनच निवाऱ्याकरीता शासनाने अनेक उपाय योजना केल्या आहेत. '१९५७ मध्ये देशात ग्रामीण आवास योजना सुरू केली.'[२] १९५७ साली सामुदायिक विकास अभियानांतर्गत चालू केलेल्या या ग्रामीण आवास योजनेत ५००० प्रति आवास असे कर्ज दिले जात होते. मात्र, या योजनेतून १९८० पर्यंत केवळ ६७,००० घरांचीच निर्मिती झाली. १९७२–७३ च्या लोकसभा प्राक्कलन समितीच्या अहवालानुसार देशाची ८३ टक्के जनता ग्रामीण भागात राहते आणि त्यातील ७३ टक्के ग्रामीण जनता कच्च्या घरांमध्ये राहते. तरीही शासनाने यावर पाहिजे तेवढे लक्ष दिले नव्हते. या समितीच्या अहवालानंतर मात्र ग्रामीण निवाऱ्याच्या समस्येसंबंधी सरकारने ठोस पावले उचलण्यास सुरूवात केली.

'इंदिरा आवास योजना ही देशात १९८३ पासून सुरू झालेली देशातील सर्वात मोठी ग्रामीण आवास योजना आहे. या योजनेची उत्पत्ती ग्रामीण रोजगार कार्यक्रमांच्या माध्यमातून झाली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना १९८३ मध्ये देशात सुरू झाली. या योजनेतूनच इंदिरा आवास योजनेतील घराच्या बांधकामांना सुरूवात झाली.'[३] मात्र देशातील राज्यांमध्ये ग्रामीण निवारा योजनेसंबंधी एकसमान धोरण ठरवण्यात आले नव्हते.

१९८५ मध्ये ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून काही निधी हा अनुसूचित जाती/जमाती व मुक्त केलेल्या वेठबिगारांच्या घरबांधणीसाठी खर्च करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. म्हणजेच '१९८५ साली इंदिरा आवास योजना ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रमाचा भाग म्हणून राबविली गेली.'[४] त्यानंतर १९८९ पासून इंदिरा आवास योजनेला जवाहर रोजगार योजनेचा एक भाग करण्यात आले. त्यानुसार जवाहर रोजगार योजनेतील ६ टक्के निधी इंदिरा आवास योजनेकरीता खर्च करण्याचे प्रावधान केले गेले. १९९३–९४ मध्ये इंदिरा आवास योजनेच्या कक्षा रूंदावल्या व हा कार्यक्रम आता केवळ अनुसूचित जाती/जमाती पुरताच मर्यादित न राहता अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त ग्रमीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांनाही या योजनेत समाविष्ठ करण्यात आले आणि जवाहर रोजगार योजनेच्या ६ टक्के निधी ऐवजी १० टक्के निधी इंदिरा आवास योजनेवर खर्च करण्याचे उद्दिष्ट ठरविले गेले. '१ एप्रिल १९९६ पासून इंदिरा आवास योजनेला जवाहर रोजगार

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | September 2021 Issue-80, Vol-01 | 085

योजनेपासून स्वतंत्र करण्यात आले. इंदिरा आवास योजना आता भारतात ग्रामीण विकास मंत्रालयाची योजना म्हणून राबविली जाते.[५]

**इंदिरा आवास योजनेचे उद्देश** : इंदिरा आवास योजनेचे उद्देश हे पुढीलप्रमाणे देण्यात आले आहेत --

१. 'इंदिरा आवास योजनेचा मुख्य उद्देश दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती/जमाती तसेच मुक्त वेठबिगार/बेघर लोकांना आवश्यक सुविधांनी परिपूर्ण निःशुल्क आवास उपलब्ध करून देणे आहे.[६]

२. 'या योजने अंतर्गत ३ टक्के हिस्सा ग्रामीण भागात राहणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील अपंग व माणसिक दृष्ट्या मतीमंद व्यक्तीसाठी आरक्षित केला आहे.[७]

३. अनुसूचित जाती व्यतिरिक्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देण्याकरीता ४० टक्के निधी खर्च करणे.

४. १९९५--९६ पासून इंदिरा आवास योजनेचा लाभ सैनिक कारवाहीत शहीद झालेल्या संरक्षण/सेवा/निमलष्करी दलाच्या कर्मचाऱ्यांच्या पत्नी किंवा कुटुंबांनाही दिला जातो.

५. 'माजी सैनिक तसेच निमलष्करी दलाच्या निवृत्त अधिकाऱ्यांनाही या योजनेत समाविष्ठ करून घेण्यात आले आहे.[८]

**इंदिरा आवास योजनेतंर्गत लाभार्थीसाठी निधी** : ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील सर्वसाधारण अनुसूचित जाती/जमाती,वेठबिगार/अनुसूचित जाती--जमाती व्यतिरिक्त इतर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना निवाऱ्याची सोय करण्याकरीता इंदिरा आवास योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत वेगवेगळ्या गटांसाठी खालीलप्रकारे निधी निर्धारीत करण्यात आले आहेत.

१. एका वित्तीय वर्षात इंदिरा आवास योजनेला उपलब्ध असलेल्या एकूण निधी पैकी ६० टक्के निधी हा दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती / जमातींच्या कुटुंबांना घरे बांधून देण्यासाठी किंवा घराच्या डागडूजीसाठी उपयोगात आणला जावा.

२. अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त इतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या घराचे बांधकाम व दुरूस्तीसाठी जास्तीत जास्त ४० टक्के निधी उपयोगात आणला जावा.

३. 'शारीरिक व मानसिक दृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के निधी उपयोगात आणला जावा.[९]

४. 'या योजनेकरीता केंद्रशासनाकडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के निधी उपलब्ध करून दिला जातो. केंद्रशासीत प्रदेशात १०० टक्के निधी भारत सरकारद्वारे उपलब्ध करून दिला जातो.[१०]

५. 'सन २००७--०८ पासून अल्पसंख्यांकांसाठी १५ टक्के निधी आरक्षित ठेवण्यात येत आहे.[११]

**लाभार्थी निवडीचा प्राधान्यक्रम** : इंदिरा आवास योजनेमध्ये लाभार्थ्यांची निवड करताना खालील गटांना प्राधान्य दिले जाते.

१. मुक्त वेठबिगार

२. अनुसूचित जाती / जमातीतील अत्याचारास बळी पडलेली कुटुंबे.

३. अनुसूचित जाती / जमातीतील विधवा, अविवाहित व परित्यक्ता महिलांची कुटुंबे.

४. अनुसूचित जाती / जमातीतील चक्रीवादळ, भूकंप, आग, पूर अशा नैसर्गिक आपत्ती किंवा मानवी दंगलीमुळे बाधीत झालेली कुटुंबे.

५. अनुसूचित जाती / जमातीचे अन्य दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे.

६. गैर अनुसूचित जाती / जमातीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे.

७. सैनिकी कारवाईत मारल्या गेलेल्या संरक्षण / सेवा / निमलष्करी दलाच्या कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नी किंवा कुटुंबे.

८. शारीरिक दृष्ट्या किंवा मानसिक दृष्ट्या अपंग व्यक्ती.

९ माजी सैनिक, निमलष्करी दलातील निवृत्त कर्मचारी.

वरील सर्व गटातील ज्या व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील असतील त्यांचीच लाभार्थी म्हणून निवड केली जाते.

**इंदिरा आवास योजनेत लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया** : इंदिरा आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड

करण्यासाठी केंद्र शासनाकडून दरवर्षी घरकुलाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येते. त्यामध्ये राज्यशासनाला बदल करता येत नाही. केंद्रशासनाच्या आदेशानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा त्या वर्षाकरीता उपलब्ध झालेल्या घरकुलाच्या संख्येतून पंचायतवार किती घरकुल बांधता येतील याची संख्या निर्धारीत करून पंचायतवार यादी ग्रामपंचायतींना पाठविली जाते. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी व्यक्तीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या दारिद्र रेषेखालील बेघर कुटुंबाच्या प्रतिक्षा यादीत सामील असणे आवश्यक आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून ग्रामपंचायतीना घरकुलांची निर्धारीत संख्या पाठविल्यानंतर ग्रामसभा योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार दारिद्र रेषेखालील बेघर कुटुंबाच्या प्रतिक्षा यादीतून निर्धारीत संख्येएवढ्या कुटुंबांची निवड करेल. ग्रामसभेद्वारे केली जाणारी लाभार्थ्यांची निवड ही अंतिम असेल. त्याकरीता अन्य कोणाचेही अनुमोदन लागणार नाही. ही यादी निवडल्यानंतर ती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे माहितीसाठी पाठविली जाईल.

**लाभार्थ्यांचा सहभाग :** इंदिरा आवास योजनेमध्ये घरकुलांचे बांधकाम लाभार्थ्यांना स्वतः करून घ्यावे लागते. जिल्हा परिषद / जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा लाभार्थ्यांना कच्चा माल मिळवून देण्यासाठी मदत करतील. तसेच योग्य घरकुलाच्या निर्मितीसाठी गरज भासल्यास समिती नेमता येईल.

**इंदिरा आवास योजनेत देण्यात येणारे अनुदान :** इंदिरा आवास योजने अंतर्गत दिले जाणारे अनुदान हे वेगवेगळ्या काळात बदललेले दिसून येते. '१ एप्रिल २००४ च्या संशोधनानुसार सपाट जागेवरील घरांसाठी २०,००० रु. रक्कम होती ती २५,००० करण्यात आली तसेच दुर्गम भागांकरीता जी रक्कम २२,००० होती ती २७,००० करण्यात आली. तसेच कच्च्या घरांच्या पुनरुज्जीवनासाठीची सीमा रु १०,००० हून १२,००० करण्यात आली.[१२]

एप्रिल २००८ मध्ये या अनुदान राशीमध्ये पुन्हा बदल करण्यात आला. त्यानुसार 'या योजनमेंमध्ये एक घर बनविण्याकरीता सपाट जागेवरील घराकरीता २५,००० व पहाडी, दुर्गम भागातील घरांकरीता २७,००० रु. ठरविले होते ते वाढून अनुक्रमे ३५,००० रु. आणि ३८,५०० रु. केले गेले[१३] १ एप्रिल २०१३ पासून केंद्रशासनाने दर्जेदार घरांच्या निर्मिती करीता प्रति घरकुल ७०,००० रु. इतकी सुधारीत किंमत निर्धारीत केली आहे. राज्य शासनाने प्रत्येक घरकुलासाठी २५,००० रु. अतिरिक्त हिस्सा निश्चित केला आहे. त्यामुळे आता प्रतिघरकुलाची किंमत रु. १,००,००० इतकी निश्चित करण्यात आली आहे तर डोंगरी आणि दुर्गम भागसाठी १,०५,००० रु. इतकी करण्यात आली आहे.

**स्वतःची जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी योजना :** इंदिरा आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील बेघर कुटुंबापैकी ज्याच्याकडे स्वतःच्या मालकीची जागा नाही अशा कुटुंबांना जागा उपलब्ध करून देण्यासाठीही केंद्र शासनाने एक योजना सुरू केली आहे. या योजनेत केंद्र व राज्याचा हिस्सा ५०:५० टक्के असा असतो. या योजनेत घरकुलाकरीता लाभार्थ्यास १०० ते २५० चौरस मिटर जागा खरेदी करीता २०,००० रु. किंवा खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढे आर्थिक सहाय्य लाभार्थ्यास करण्यात येईल.

**इंदिरा आवास योजनेतील घराविषय आवश्यक बाबी :** या योजनेतील घर बांधताना खालील बाबींना बंधनकारक करण्यात आले आहे.

१. इंदिरा आवास योजनेतील घरकुल बांधताना सोबतच स्वच्छ शौचालय आणि धूर विरहीत चुल बांधणे बंधनकारक करण्यात आले आहे.

२. इंदिरा आवास योजनेतील घरांसाठी कमीत कमी २० मिटर चौरस फुट जागा उपलब्ध असावी.

३. इंदिरा आवास योजनेतील घरांना लाभार्थी कुटुंबातील महिला सदस्याचे नाव दिले जाईल किंवा पती–पत्नी दोघांचे नाव देता येईल.

**इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :** जिल्हा पातळीवर इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांची असेल. ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत इंदिरा आवास योजनेच्या अंमलबजावणीस जबाबदार असेल.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | September 2021 Issue-80, Vol-01 | 087

**इंदिरा आवास योजनेचे योगदान** : इंदिरा आवास योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. यात केंद्र–राज्य यांचा हिस्सा अनुक्रमे ७५:२५ असा आहे. "१९८५–८६ म्हणजेच या योजनेच्या सुरूवातीपासून ते डिसेंबर २००२ पर्यंत सुमारे ९२ लाख घरांची निर्मिती करण्यात आली. ज्यावर सुमारे १५ हजार ८४० कोटी रुपये खर्च झाले."[१४] तर "२००६ पर्यंत या योजनेतून सुमारे ११४.७८ लाख घरे बांधली गेली आणि त्यावर एकूण २०,०२३ कोटी रुपये खर्च करण्यात आले."[१५] "२००५–०६ पासून २००८–०९ पर्यंत ६० लाख घर बनविण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले होते मात्र या कालावधीत २१,७२० कोटी रुपये खर्च करून ७१.७६ लाख घरांची निर्मिती करण्यात आली. भारत निर्माणच्या दुसऱ्या टप्प्यात १.२० कोटी घरांचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले. त्यानुसार २००९–१० मध्ये ४०.५२ लाख घराचे उद्दिष्ट होते. मात्र केवळ ३३.८६ लाख घरांची निर्मिती करण्यात आली. २०१०–११ मध्ये २९.०९ लाख घरांचे उद्दिष्ट होते तर प्रत्यक्षात २७.१५ लाख घरांची निर्मिती झाली. २०११–१२ या वर्षात, २७.२६ लाख घरांचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले मात्र वास्तवात २३.९३ लाख घरांची निर्मिती करण्यात आली."[१६]

**महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेचे योगदान** : 'महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेंतर्गत सुरूवातीपासून डिसेंबर २००६ अखेरपर्यंत २३४१ कोटी रुपये खर्चासह ९८४१२४ घरांचे बांधकाम पूर्ण झाले.[१७] केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेतून २००३–०४ ते २०११–१२ या कालावधीतील असलेले लक्ष्य, त्यातून पर्ण झालेले साध्य आणि त्यावर झालेला खर्च सारणी मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात आलेली घरे व त्यावर झालेला खर्च (महाराष्ट्र राज्य)**

| अ.क्र. | वर्ष | लक्ष्य | साध्य | खर्च (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २००१–०२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २ | २००२–०३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ३ | २००३–०४ | १००३६५ | १०१७९४ | २२७ |
| ४ | २००४–०५ | १०५६२२ | १२५३४७ | २२६ |
| ५ | २००५–०६ | ७८४७८ | ९४०५४ | २३८ |
| ६ | २००६–०७ | ८३४०३ | ७८४२७ | २४६ |
| ७ | २००७–०८ | ११५८७९ | १२५२४१ | उ.ना. |
| ८ | २००८–०९ | ११५८६९ | ११४१७६ | ४८१ |
| ९ | २००९–१० | २२३६५३ | २०५१४९ | उ.ना. |
| १० | २०१०–११ | १५५०५२ | १५८०२७ | १०९१ |
| ११ | २०११–१२ | १५१०६३ | १५३१८५ | १९७ |
| एकूण | | ११,२९,४११ | ११,५५,४०० | |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, २००६–०७ ते २०१२–१३; अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

वरील सारणी वरून असे स्पष्ट होते की, स्पष्ट होते की २००३–०४ ते २०११–१२ या कालावधीत इंदिरा आवास योजनेअंतर्गत ११,२९,४११ घरांचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. मात्र त्या तुलनेत या कालावधीत इंदिरा आवास योजनेतून ११,५५,४०० घरे बांधून पूर्ण करण्यात आली. २००३–०४ मध्ये १,००,३६५ घरे बांधण्याचे लक्ष्य होते तर प्रत्यक्षात २२७ कोटी रुपये खर्च होऊन १०१, ७९४ इतकी घरे बांधून पूर्ण झाली, अर्थात १०१.४२ टक्के घरे या वर्षात बांधण्यात आली. २००४–०५ मध्ये १०५,६२२ घरांचे उद्दिष्ट होते, तर प्रत्यक्षात २२६ कोटी रुपये खर्च करून १२५,३४७ घरे अर्थात ११८.६७ टक्के घरे बांधण्यात आली. २००५–०६ मध्ये ७८,४७८ घरांचे उद्दिष्ट होते मात्र याही वर्षात प्रत्यक्षात २३८ कोटी रुपये खर्च करून ९४,०५४ घरे बांधण्यात आली, ज्याची टक्केवारी ११९.४७ एवढी आहे. २००६–०७ मध्ये ८३,४०३ घरांचे उद्दिष्ट होते, त्या तुलनेत या वर्षात ७८,४२७ अर्थात ९४ टक्के घरे पूर्ण करण्यात आली आणि त्यावर २४६ कोटी रुपये खर्च झाला. २००७–०८ मध्ये ११५,८७९ घरांचे उद्दिष्ट होते तर प्रत्यक्षात १२५,२४१ अर्थात १०८ टक्के घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २००८–०९ मध्ये ११५,८६९ घरांचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते आणि प्रत्यक्षात ११४,१७६ अर्थात ९८.५३ टक्के घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. त्याकरीता ४८१ कोटी रुपये खर्च करण्यात आला. २००९–१० मध्ये २२३,६५३ घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते त्यापैकी २०५,१४९ अर्थात ९१.७२ टक्के घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २०१०–११ मध्ये १५५,०५२ घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते तर प्रत्यक्षात १५८,०२७ अर्थात १०२ टक्के घरे बांधून पूर्ण करण्यात आली आणि त्यावर १०९१ कोटी रुपये खर्च करण्यात आला. २०११–१२ मध्ये इंदिरा आवास योजनेतून १५१,०६३ घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते तर प्रत्यक्षात १५३, १८५ अर्थात घरे बांधून पूर्ण करण्यात आली आणि त्यावर

१९७ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, २००६–०७, २००८–०९ आणि २००९–१० चा अपवाद वगळता इतर वर्षात ठरवीलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त घरे इंदिरा आवास योजनेतून बांधण्यात आली आहेत.

**३.७.३ अकोला जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेचे योगदान : २००१–०२ ते २०११–१२**

या अभ्यास कालावधीत इंदिरा आवास योजनेतून अकोला जिल्ह्यात बांधण्यात आलेली घरे आणि जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर याचे विवेचन सारणी ३.७.२ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**इंदिरा आवास योजनेतून बांधकाम पूर्ण झालेली व जुन्या घरांची श्रेणीवाढ करण्यात आलेली घरे (जिल्हा अकोला)**

| अ. क्र. | वर्ष | नवीन घर बांधकाम | जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २००१–०२ | २८१ | ४८६ | ७६७ |
| २ | २००२–०३ | ९९१ | ६६३ | १६५४ |
| ३ | २००३–०४ | ६१७ | ३१५ | ९३२ |
| ४ | २००४–०५ | ४४८ | ८९६ | १३४४ |
| ५ | २००५–०६ | ९१३ | — | ९१३ |
| ६ | २००६–०७ | ७०७ | — | ७०७ |
| ७ | २००७–०८ | १२८९ | — | १२८९ |
| ८ | २००८–०९ | २४४६ | — | २४४६ |
| ९ | २००९–१० | २५१० | — | २५१० |
| १० | २०१०–११ | १७०९ | — | १७०९ |
| ११ | २०११–१२ | १६९१ | — | १६९१ |
| | एकूण | १३६०२ | २३६० | १५९६२ |

स्त्रोत: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००२ ते २०१२.

वरील सारणी मधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, २००१–०२ ते २०११–१२ या कालावधीत इंदिरा आवास योजनेंतर्गत अकोला जिल्ह्यात एकूण १३६०२ नवीन घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, तर २३६० जुन्या घरांची श्रेणीवाढ करून त्यांचे नव्या घरात रुपांतर करण्यात आले आहे. अभ्यासकालावधीत २००६–०७ या वर्षात सर्वात कमी म्हणजेच ७०७ नवीन घरकुले बांधण्यात आली तर २००९–१० या वर्षात सर्वात जास्त म्हणजे २५१० एवढी घरकुले बांधण्यात आल्याचे दिसून येते. अध्ययन कालावधीमध्ये २००१–०२ या वर्षात २८१ नवीन घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, तर ४८६ जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर करण्यात आले. २००२–०३ मध्ये ९९१ नवीन घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, तर ६६३ जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर करण्यात आले असा एकूण १६५४ लाभार्थ्यांना या वर्षात इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला. २००३–०४ मध्ये ६१७ नवीन घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, तर ३१५ जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर करण्यात आले असे एकूण ९३२ लाभार्थी या वर्षात इंदिरा आवास योजनेतून लाभान्वित झाले. २००४–०५ मध्ये ४४८ नवीन घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले तर ८९६ जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर करण्यात आले असे एकूण १३४४ लाभार्थी या वर्षात लाभान्वित झाले. २००५–०६ मध्ये ९१३; २००६–०७ मध्ये ७०७; २००७–०८ मध्ये १२८९; २००८–०९ मध्ये २४४६; २००९–१० मध्ये २५१०; २०१०–११ मध्ये १७०९ आणि २०११–१२ मध्ये १६९१ नवीन घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. अशाप्रकारे नवीन घरांचे बांधकाम व जुन्या घरांचे नवीन घरात रुपांतर याद्वारे अध्ययन काळात एकूण १५९६२ लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष**

१. शासनाद्वारे ग्रामीण भागातील मागास व दारिद्र्यरेषेखालील घर नसलेल्या कुटुंबाला घर मिळवून देण्यासाठी अनेक आवास योजना राबवीत आहे. त्यापैकी अतिशय महत्त्वाकांक्षी अशी इंदिरा आवास योजना आहे. इंदिरा आवास योजनेतून अनेक बेघर कुटुंबांना निवारा उपलब्ध होत आहे.

२. शासन राबवीत असलेल्या आवास योजनांमुळे ग्रामीण जनतेच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

**३. संदर्भग्रंथ सूची :**

१. सहोता, अवतार सिंह, ग्रामीण आवास : केंद्र तथा राज्यों के कार्यक्रम, कुरूक्षेत्र, ऑक्टोबर

131

२००५, पृ. क्र. ४

२. Indira Awas Yojana, Guidelines, Govt. of India, Misnistery of Rural Development Krishi Bhavan, New Delhi

३. सहोता, अवतार सिंह, ग्रामीण आवास : केंद्र तथा राज्यों के कार्यक्रम, कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००५, पृ. क्र. ५

४. पसूका, इंदिरा आवास योजनासे सच हुआ सपना, कुरूक्षेत्र, जून २००७, पृ. क्र. ४७

५. माधवराव, व्ही., सितारामन, श्रीधर, ग्रामीण आवास : आयाम और मुद्दे, कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००६, पृ. क्र. ६

६. जमुआर, डॉ. रविशंकर, भारत में ग्रामीण विकास, पृ. क्र. ८८

७. ऋतु, 'घटती निर्धनता और रोजगार के बढते अवसर', कुरूक्षेत्र, न्यू दिल्ली, फरवरी २००८, पृ. क्र. २०

८. माधवराव, व्ही., सितारामन, श्रीधर, ग्रामीण आवास : आयाम और मुद्दे, कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००६, पृ. क्र. ६

९. ग्रामीण विकास मंत्रालय की वार्षिक रिपोर्ट, २००४-०५

१०. कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००५, पृ. क्र. ४६

११. www.rdd.maharashtra.gov.in

१२. गुप्ता, यु.सी., वर्मा, प्रतिक, 'ग्रामीण विकास परियोजना', प्र.क्र. १०५

१३. जमुआर, डॉ. रविशंकर, भारत में ग्रामीण विकास, प्र.क्र. ९५

१४. माधवराव, वी. आणि सीतारमन श्रीधर, 'ग्रामीण आवास: आयाम और मुद्दे', कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००६, पृ. ०८

१५. अग्रवाल, उमेशचंद्र, 'ग्रामीण आवास', कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २००६, पृ. १४

१६. सिंह, संतोष कुमार, 'सर्वांगिण विकास पर ध्यान', कुरूक्षेत्र, ऑक्टोबर २०१२, पृ. २१ व २२

१७. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००६—०७, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १२०

20

# मानवाधिकार आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

प्रा.डॉ. बी.आर. कुंडगीर
अर्थशास्त्र विभाग,
नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ

**प्रस्तावना :-**

अगदी प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ व आजच्या काळापर्यंतचा विचार केला तर भारतात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक क्षेत्रात स्त्रियांना दिलेल्या दर्जाबाबत भिन्नता आढळते. काही अपवाद वगळता अन्य काल खंडात स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. सध्या जगात बहुतांश देशात लोकशाहीचा स्विकार केल्याचे दिसून येते व भारतात देखील लोकशाहीचा स्विकार करण्यात आला. लोकशाही व्यवस्था स्विकारल्या नंतर निश्चितच स्त्री-पुरूष समानतेचा स्विकार केल्याचे दिसून येते. परंतू व्यावहारिक पातळीवर विचार केल्यास लिंग भेदभाव केल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर मानवाधिकार आणि महिलांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण हा मानवी हक्कांचा प्रश्न महत्वाचा आहे. मानवी कल्याणाचा विचार प्रथमच गौतम बुध्दाने मांडला. त्यातून मानवामध्ये मतभेद होऊन दुःखाचीच निर्मिती व्हायची. यावर उपाययोजना म्हणून मानवी हक्का संबंधी तडजोड हा उपाय अस्तित्वात आला आणि मग मानवी हक्क प्रस्थापीत झाले. दैनंदीन जीवनात स्त्रियांकडे कुटुंबाची व्यवस्था पाहणे, घरकाम, चुल आणि मुल हीच कर्तव्य स्त्रियांना देण्यात आली. घराबाहेरची कामे स्त्रिया करू शकत नाहीत असे अनेक पुरूष समजतात. म्हणजे स्त्रियांसाठी विशिष्ठ कामे तर पुरूषांसाठी विशिष्ठ कामे योग्य आहेत असा समज करून घेण्यात आला. जगभरात अनेक रूढी, परंपरा चालत आलेल्या आहेत. त्यातून स्त्रियांच्या नशीबात नेहमी भेदभाव आलेला आहे. परंतू आधुनिक काळात स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक दर्जात सुधारणा घडऊन आणण्यात मानवी हक्क महत्वाची भूमिका बजाऊ शकतात.

**अभ्यासाचे उद्देश :-**

१. मानवी हक्कांचा अभ्यास करणे.

२. राज्य घटनेतील स्त्रियांचे महत्व किंवा स्थान स्पष्ट करणे.